**प्रेस नोट दिनांक १६/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**सहकारनगर पोलीस ठाणेचे गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेवून त्यास ताब्यात घेवून सहकारनगर पोलीस ठाणेचे गुन्हयात पुढील तपासकामी ताब्यात देण्यात आला.**

**-----------||-----------**

दिनांक १५/७/२०१९ रोजी खडक पोलीस स्टेशनचे क्रिप्र्स टार्स्क वर सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ५७/२०१८ भा.दं.वि कलम ४२०, ४१९, ४६८, ४६७, ४७१, ४११, ३४ या गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे रफीक दस्तगीर यादगीर रा.५३७,घोरपडे पेठ पुणे याचे संदर्भात माहिती पोउपनि वाघमोरे व सर्व्हेलन्स चे पोलीस कर्मचारी पोना ६७५२ बारावकर, पोकॉ ७५५७ कांबळे, पोकॉ ७७४० मोधे व फडगेट पोलीस चौकीचे मार्शल पोना ७७२४ पवार व पोकॉ ७७२५ तावरे यांना प्राप्त झाली.

सदर आरोपीचे दिले पत्त्यावर नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी जावुन शोध घेतला असता तो राहते घरी मिळुन आल्याने त्यास त्यांनी नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे रफीक दस्तगीर यादगीर वय ४४ वर्षे रा.५३७, घोरपडी पेठ पुणे असे असल्याचे सांगितल्याने नमुद आरोपीस ताब्यात घेवून त्याबाबत सहकानगर पोलीस ठाणेशी संपर्क साधला असता, सदरचा आरोपी हा सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ५७/२०१८ भा.दं.वि कलम ४२०, ४१९,४६८,४६७, ४७१,४११,३४ पाहिजे आरोपी नामे रफीक दस्तगीर यादगीर रा.५३७, घोरपडे पेठ पुणे या गुन्हयातील पाहीजे आरोपी असल्याने आरोपीस दाखल गुन्हयाचे पुढील तपासकामी सहकारनगर पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.